पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८
मा.क्रिडा समिति
कार्यपत्रिका क्रमांक :- ८

**सभावृत्तांत**

दिनांक :- १६ / ०८ / २०१२ वेळ :- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक १६/०८/२०१२ रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. थोरात वनिता एकनाथ - सभापती
२) मा. आसवानी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. बोकड रामदास गेणभाऊ
५) मा. जयश्री वसंत गावडे
६) मा. मोरेश्वर महादू भोंडवे
७) मा. अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार

याशिवाय मा. चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.माछरे - विशेष अधिकारी, मा.पानसरे - क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक :- मा.रामदास बोकड अनुमोदक :- मा.वैशाली काळभोर

केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्री व महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख व क्रिडा विभागातील कर्मचारी राजेंद्र प्रसाद यांचे दु:खद निधन झालेले असलेने त्यांना श्रध्दांजली वाहून सभा बुधवार दि. ०५/०९/२०१२ दुपारी ३.४५ पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली )**

मा.सभापती - बुधवार दिनांक ०५/०९/२०१२ दुपारी ३.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**[ थोरात वनिता एकनाथ ]**
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८
मा.क्रिडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक :- ८

**सभावृत्तांत**

( दिनांक १६/०८/२०१२ ची तहकूब सभा )

दिनांक :- ०५ / ०९ / २०१२ वेळ :- दुपारी ३.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची दिनांक १६/०८/२०१२ ची तहकूब सभा बुधवार दिनांक - ०५/०९/२०१२ रोजी दुपारी ३.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. थोरात वनिता एकनाथ - सभापती
२) मा. पांढरकर निलेश शंकरराव
३) मा. आसवानी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
४) मा. भालेकर शांतराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
५) मा. बोकड रामदास गेणभाऊ
६) मा. जयश्री वसंत गावडे
७) मा. अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार

याशिवाय मा.माछरे - विशेष अधिकारी, मा. सहस्रभोजनी - प्र.उपनगरसचिव, मा.पानसरे - क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक :- मा.निलेश पांढरकर अनुमोदक :- मा.संपत पवार

आकुर्डी येथील पैलवान गोरक्ष शाम निंबळे याचे नुकतेच अपघाती निधन झाले असल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**( उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली )**

----------

ठराव क्रमांक :- २०		विषय क्रमांक :- १
दिनांक :- ०५/०९/२०१२		विभाग :- क्रिडा
सुचक :- मा. रामदास बोकड		अनुमोदक :- मा. निलेश पांढरकर
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.क्रिडा/७/कावि/२७६/२०१२, दि. ०७/०८/२०१२

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावात नमुद प्रमाणे शासकीय जिल्हास्तर शालेय क्रिडास्पर्धा २०११-१२ अनुषंगाने प्रस्तावात नमुद ५१ खेळांपैकी १८ खेळांच्या स्पर्धांचे आयोजन खाजगी शाळांकडे सोपविल्याने त्याकामी त्यांना द्याव्या लागणा-या र.रु.१,२१,८४७/- चे खर्चास मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक :- २१		विषय क्रमांक :- २
दिनांक :- ०५/०९/२०१२		विभाग :- क्रिडा
सुचक :- मा. जयश्री गावडे		अनुमोदक :- मा. हिरानंद आसवानी
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.क्रिडा/७/कावि/२७७/२०१२, दि. ०७/०८/२०१२

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावात नमुद प्रमाणे जिल्हास्तर शालेय ५० खेंळ प्रकारांच्या क्रिडा स्पर्धा २०१२ - १३ आयोजित करणेस व स्पर्धेकामी पी.व्ही.सी.फ्लेक्स, बॅनर, पंच मानधन, पंच चहा - अल्पोपहार खर्च, नारळ, बुके, पूजा खर्च, स्टेशनरी खर्च, साहित्य भाडेपोटी खर्च, प्रेक्षागृह भाडे, इतर खर्च इ. सन २०१२-१३ मध्ये विभागीयस्तर स्पर्धेसाठी म.न.पा.शाळेतील अंदाजे ३०० विद्यार्थी खेळाडू व राज्य पातळीवर १५०, राष्ट्रीय पातळीवर ५० व संघटनेमार्फत आयोजित क्रिडा स्पर्धेसाठी ५० शालेय खेळाडू त्यांच्या समवेत जाणारे क्रिडा शिक्षक व व्यवस्थापक यांचे प्रवास खर्च दैनिक भत्ता, प्रवेश फी, औषध खर्च, इ. अदा करणेकामी अंदाजे र.रु.१,००,०००/- तसेच खाजगी शाळा १४ क्रिडा स्पर्धा आयोजित करणार असल्याने त्यांना स्पर्धेचा खर्च र.रु.९४,३९०/- अदा करणेस असे एकूण येणा-या संभाव्य खर्च र.रु.८,६७,७१०/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता घेणेस तसेच जिल्हास्तर शालेय क्रिडा स्पर्धा अनुषंगाने मंडप, बैठक व्यवस्था, ध्वनी/ विद्युत व्यवस्था मैदान तयार करणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, इ. स्वरुपाचा खर्च हा प्रभाग कार्यालयामार्फत होणार आहे. त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च प्रभागाचे अंदाजपत्रकातून खर्ची टाकणेस, जिल्हास्तर शालेय क्रिडा स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च क्रिडा निधी-वार्षिक क्रिडा स्पर्धा, क्रिडा कला साहित्य या लेखाशिर्षावर केलेल्या एकूण तरतूद र.रु.४०,००,०००/- मधून खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २२ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- ०५/०९/२०१२ विभाग :- क्रिडा
सुचक :- मा. शांताराम भालेकर अनुमोदक :- मा. संपत पवार
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.क्रिडा/अस्था-२/कावि/५९५/२०१२, दि. ०८/०८/२०१२

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावात नमुद प्रमाणे एकत्रित मानधनावर विविध प्रकारचे खेळांकरिता क्रिडा शिक्षकांची तात्पुरत्या स्वरुपात ६ महिने कालावधीकरीता नेमणूक करावयाची झालेस एकूण अपेक्षित खर्च र.रु.२,१०,०००/- फक्तचे खर्चास व पदनामाचे पदे तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर ६ महिने कालावधीकरीता जाहिरात प्रसिध्दी करुन भरणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**[ थोरात वनिता एकनाथ ]**
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/४/कावि/११५५/२०१२
दिनांक :- ०६/०९/२०१२ चे लगत

**प्र. उपनगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.